Recent Trends in

# Social Sciences

## सामाजिक शास्त्रातील नवीन प्रवाह



Late Ramesh Warpudkar College
Sonpeth Dist. Parbhani (M.S.)

# Recent Trends in Social Sciences

# सामाजिक शास्त्रातील नवीन प्रवाह

***Publisher***
I/C. Principal,
Arts and Commerce College, Nagthane,
Tal and Dist. Satara

@ All Rights Reserved to the Publisher only

First Edition - May 2023

Printed by
***Tanvi Enterprise***
855/A, Shaniwar Peth,
Satara - 415 002
Mob. 9673835203

- ISBN No.978-81-949976-0-8

- Price - 400/-

---

Note -
The editorial board and publisher do not necessarily agree with the views expressed in the research paper in the book. It will be the author's responsibility.

अशा या महान कर्मयोगांचा दि. २७ फेब्रुवारी १९९२ रोजी मृत्यू झाला. आपल्या कार्यकर्तृत्वाने अप्पासाहेब संस्थात्मक रूपाने आजही आपल्यात आहेत.१२ व्या शतकात राघवांकाने आपल्या सिद्धराम पुराणात सोलापूर शहराला दुसरे कैलास असे संबोधले आहे ही गोष्ट १२ व्या शतकातील झाली तर आज विसाव्या शतकात सोलापूरबद्दलची ही गोष्ट श्री. मल्लाप्पा वारद, उद्योगपती वालचंद हिराचंद दोशी, सोलापूरचे चार हुतात्मे,डॉ.द्वारकानाथ कोटणीस इ.व्यक्तींनी खरी ठरवली आणि याच पदपथावरून मडिवाळप्पा बंडाप्पा उर्फ म.बं काडादी हे चालले.

**संदर्भ:-**


१) पुजारीडॉ.बी.बी.(२०१०) सोलापूरच्या सामाजिक प्रगतीमध्ये विरशैवांची भूमिका - रोहिणी प्रकाशन- प्रथमावृत्ती

२) पुजारी डॉ. बी. बी.(२०१७) कर्मयोगी अप्पासाहेब काडादी(कन्नड)- मराठीअनुवाद- नींबर्गी जगदिशचंद्र (२०१७)रोहिणीप्रकाशन -प्रथमावृत्ती

३) शतसंवत्सरिक ग्रंथ -प्रकाशक सोलापूर महानगरपालिका

४) यात्रिक (मराठी)-(१९७५) प्रकाशक-अध्यक्ष,गौरव ग्रंथ समिती - प्रथमावृत्ती


***



# शाश्वत विकासात समाज आणि प्रशासनाची भूमिका


**डॉ. सुनीता आत्माराम टेंगसे**

समाजशास्त्र विभाग प्रमुख

कै. रमेश वरपुकर महाविद्यालयातील सोनपेठ.जिल्हा-परभणी



Late.Ramesh Warpudkar Colleege Sonpeth Dist.Parbhani (M.S.)


**प्रस्तावना:**

विकास हा मानवाचा स्थायीभाव आहे.वर्तमान परिस्थितीमध्ये अशा स्वरूपाचा बदल व सुधारणा करणे ज्यामुळे त्या परिस्थितीमध्ये सकारात्मक दृष्टिकोन वाढीस लागतो तो विकासाशी निगडित असतो.विकास ही एक अखंड प्रक्रिया आहे.बदल वा वाढ होत राहील तसतसा विकास होत राहतो. विकास प्रामुख्याने आर्थिक,सामाजिक,राजकीय,सांस्कृतिक क्षेत्राशी संबंधित आहे.या सर्व क्षेत्रांमध्ये असलेल्या परिस्थितीहून अधिक चांगली परिस्थिती निर्माण करणे हे विकासाचे ध्येय असायला हवे.१९९० नंतर विकासाचे नवनवे आयाम उदयास आले. जागतिक स्तरावर विकास करताना तो केवळ वर्तमानपिढीला पूरक असू नये तर त्यात भावी पिढीचाही विचार केलेला असावा हा नवीन विचार पुढे आला.१९८७ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघांतर्गत जागतिक पर्यावरण व विकास आयोग स्थापन केला गेला.या आयोगाचे पहिले अध्यक्ष नॉर्वेचे तत्कालीन पंतप्रधान जी एच ब्रंट लँड यांनी विकास स्थिर राहावा यासाठी पर्यावरणीय समस्येचे परीक्षण करणे, नैसर्गिक साधन संपत्तीचा ऱ्हास होणार नाही याची दक्षता घेणे अशा शिफारशी मांडल्या होत्या.त्यातूनच भावी पिढीच्या गरजा भागविण्यासाठी निसर्गातील क्षमतेला कोणताही धक्का न पोचवता लोकांच्या वर्तमानकालीन गरजा पूर्ण करणे म्हणजे विकास हा अर्थ प्रचलित झाला.या विकासाला शाश्वत चिरस्थाई विकास असे ब्रटल्यांड आयोगाने म्हटले होते.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे -**

१. शाश्वत विकास म्हणजे काय हे स्पष्ट करणे.

Late Ramesh Warpudkar College, Sopneth Dist. Parbhani (M.S.)

शाश्वत विकासाची ध्येय अभ्यासणे.
शाश्वत विकासाची उद्दिष्टे जाणून घेणे.
४. जागतिकीकरणाचा शाश्वत विकासावरील परिणाम अभ्यासणे.
५. शाश्वत विकासासाठी प्रशासनाची भूमिका जाणून घेणे.
६. शाश्वत विकासात समाजाची भूमिका स्पष्ट करणे.
७. शाश्वत विकासाचे महत्त्व स्पष्ट करणे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोधनिबंध लेखनासाठी दुय्यम तथ्य सामग्रीतील संदर्भ ग्रंथ, पुस्तके, मासिके,इंटरनेट वरील माहितीचा उपयोग करण्यात आलेला आहे.

**गृहीतकृत्य**

शाश्वत विकासासाठी समाज आणि प्रशासनाची भूमिका महत्त्वाची आहे.

शाश्वत याचा अर्थ कायमस्वरूपी अस्तित्वात राहणारे चिरकाल स्थाई राहणारे असा होतो.१९७० च्या दशकात हा शब्द वापरात आला. या दशकात विकसनशील राष्ट्रांमध्ये वाढलेले स्थलांतर,नागरिकीकरण,अन्नाचा तुटवडा, उपासमार,पेयजल अशा विविध प्रश्नांनी उग्र स्वरूप धारण केले. वातावरण जिवंत ठेवणे वातावरणातील घटक जिवंत ठेवणे आणि पर्यावरणाच्या योग्य वापरामुळे पर्यावरणीय घटकांचे असंतुलन टाळणे या अर्थाने शाश्वत हा शब्द वापरला जातो.विकास म्हणजे पर्यावरण वाढ व यातून झालेला सुधारणा होय.

शाश्वतविकास ही केवळ संकल्पना नसून त्यात आपल्या संसाधनांचे जतन आणि त्यातून संपूर्ण समाजाचा विकास हा अभिप्रेत असतो.शाश्वत विकास म्हणजे जे आर्थिकदृष्ट्या उपकारक व सामाजिकदृष्ट्या न्यायी असते. जागतिक पर्यावरण व विकास आयोगाने शाश्वत विकास म्हणजे वर्तमान पिढीने विकास करताना भावी पिढीच्या गरजांची पूर्तता होईल अशा पद्धतीने आपल्या गरजांशी कोणतीही तडजोड न करण्याची क्षमता निर्माण करणे होय असे म्हटले आहे

२०१५ मध्ये,युनायटेड नेशन्स (UN) बनलेल्या१९३देशांनी शाश्वत विकासा–साठी २०३०अजेंडा स्वीकारण्यास सहमती दर्शविली.ऐतिहासिक अजेंडा १७ शाश्वत विकास उद्दिष्ट(SDGs)आणि ग्रह आणि मानवजातीसाठी सन्मान, शांतता आणि समृद्धीसाठी उद्दिष्टे दिलेली आहेत जे २०३०पर्यंत पूर्ण केले जातील.

१. गरीबी नाही: सर्वत्र गरिबी संपवा.
२. शून्य भूक : भूक संपवणे, अन्न सुरक्षा आणि सुधारित पोषण मिळवणे



आणि शाश्वत शेतीला प्रोत्साहन देणे.

चांगले आरोग्य आणि कल्याण: निरोगी जीवन सुनिश्चित करा आणि सर्व वयोगटातील सर्वांसाठी कल्याण वाढवा.

दर्जेदार शिक्षण: सर्वसमावेशक आणि न्याय्य दर्जाचे शिक्षण सुनिश्चित करणे. सर्वांसाठी आजीवन शिकण्याच्या संधींना प्रोत्साहन देणे.

लैंगिक समानता : लैंगिक समानता प्राप्त करणे आणि सर्व महिला आणि मुलींना सक्षम करणे.

स्वच्छ पाणी आणि स्वच्छता: सर्वांसाठी पाणी आणि स्वच्छतेची उपलब्धता आणि शाश्वत व्यवस्थापन सुनिश्चित करा.

परवडणारी आणि स्वच्छ ऊर्जा: सर्वांना परवडणारी, विश्वासार्ह, शाश्वत आणि आधुनिक ऊर्जेचा प्रवेश सुनिश्चित करा.

८. सभ्य काम आणि आर्थिक वाढ: शाश्वत,सर्वसमावेशक आणि शाश्वत आर्थिक वाढ,पूर्ण आणि उत्पादक रोजगार आणि सर्वांसाठी सभ्य कामाचा प्रचार करा.

९. उद्योग, नवकल्पना आणि पायाभूत सुविधा: लवचिक पायाभूत सुविधा तयार करा,सर्वसमावेशक आणि शाश्वत औद्योगिकीकरणाला प्रोत्साहन द्या आणि नवकल्पना वाढवा.

१०. विषमता कमी करणे: देशांतर्गत व देशांमधील समानता कमी करणे.

११. शाश्वत शहरे आणि समुदाय: शहरे आणि मानवी वसाहती सर्वसमावेशक, सुरक्षित, लवचिक आणि टिकाऊ बनवा.

१२. जबाबदार उपभोग आणि उत्पादन: शाश्वत उपभोग आणि उत्पादन पद्धती सुनिश्चित करा.

१३. हवामान कृती: हवामान बदल आणि त्याचे परिणाम यांचा सामना करण्यासाठी तातडीची कारवाई करा.

१४. पाण्याखालील जीवन: शाश्वत विकासासाठी महासागर, समुद्र आणि सागरी संसाधने संरक्षित करा आणि त्यांचा शाश्वत वापर करा.

१५. जमिनीवरील जीवन: स्थलीय परिसंस्थेचे संरक्षण,पुनर्संचयित आणि शाश्वत वापर, जंगलांचे शाश्वत व्यवस्थापन, वाळवंटीकरण आणि जमिनीचा ऱ्हास थांबवणे आणि जैवविविधतेचे नुकसान थांबवणे.

१६. शांतता, न्याय आणि सशक्त संस्था: शाश्वत विकासासाठी शांततापूर्ण

Late Ramesh Warpudkar College Sonpeth Dist.Parbhani (M.S.)

आणि सर्वसमावेशक समाजांना प्रोत्साहन देणे, सर्वांना न्याय मिळवून देणे आणि सर्व स्तरांवर प्रभावी, जबाबदार आणि समावेशक संस्था तयार करणे.

१७) ध्येय साध्य करण्यासाठी भागीदारी: अंमलबजावणीची साधने मजबूत करून शाश्वत विकासासाठी जागतिक भागीदारीचे पुनरुज्जीवन करणे.

सर्वांना सुखी,समाधानी, सुरक्षित व उत्कृष्ट जीवन जगता येण्यासाठी केलेला विकास हा शाश्वत विकास असतो.शाश्वत विकासामध्ये पर्यावरणाचे संतुलन आर्थिक परिस्थिती व सामाजिक स्थिती यांचाही अंतर्भाव होत असतो. विकासासाठी संसाधनाचे व्यवस्थापन करण्यास जास्त शाश्वत विकासाचा संबंध असतो. समाज ज्यावर अवलंबून असतो असा विकास आणि पर्यावरणात्मक संसाधनांमध्ये असलेल्या एकजन्सीपणाला शाश्वत विकास म्हणतात.

**शाश्वत विकासाची उद्दिष्टे –**

शाश्वतता ही संकल्पना चार पैलूंशी निगडित आहे.पर्यावरणीय,आर्थिक, सामाजिक आणि संस्थात्मक.या चारही गोष्टींमध्ये असे दिसते की,या चार पैकी एक किंवा जास्त पैलू दुर्लक्षित झाले तर त्यामुळे एकंदर समाजाची प्रगती खुंटते किंवा समाजाच्या अस्तित्वाला बाधा येते.शाश्वतता म्हणजे एखादी अवस्था जी थोड्या किंवा अनंतकाळापर्यंत टिकून राहते.पर्यावरणाची हानी न करता आपल्या साधनसंपत्तीचा वापर चालू करणे म्हणजे साधन संपत्तीच्या चिरंतन शाश्वत वापर होय.साधन संपत्तीचा चिरंतर वापर भारतीयांना नवीन नाही.वैदिक काळातही पाणी,वन,प्राणी, जमीन व इतर अनेक प्रकारचे सजीव निर्जीव घटकांचा चिरंतन वापर कसा करावा याबद्दलचे संदर्भ उपलब्ध आहेत. जगभरात झालेल्या औद्योगिकीकरणामुळे चिरंतन विकासाचे महत्त्व आधोरेखित झाले आहे. सर्व देशांना याचे महत्त्व पटले असून त्यांनी त्यांच्या नियोजनात याचा समावेश केला आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर याबाबतचा पहिला अहवाल क्लब ऑफ रोमने वाढीच्या मर्यादा (ग्रोथलिमिट) या नावाने प्रसिद्ध केला.या अहवालात साधन संपत्तीच्या अतिरिक्त वापरामुळे आपले भविष्य कसे अंधकारमय समस्यायुक्त होऊ शकते यावर प्रकाश टाकला आहे.

**१.चिरंतन विकास:**

प्रक्रियेनुसार विकास हा पुढील पिढीसाठी समृद्ध व परिपूर्ण राहील अशा दृष्टिकोनातून लक्ष केंद्रित करायला हवे.मानवाची प्रत्येक पिढी ही संसाधनांचा



विकास आणि ऱ्हास करत असते. परंतु संसाधनांच्या ऱ्हासाचा व वापराचा ...संसाधनांच्या विकासाच्या कितीतरी अधिक प्रमाणात आहे. विकास जर ...च्या वेगात सुरू राहिला तर आर्थिक विकास थांबतो

**१.पर्यावरण संवर्धन:**

हा चिरस्थाई विकास प्रक्रियेसाठी आवश्यक दुसरी बाजू आहे.आजच्या पिढीने अचक्रीत संसाधनांचा वापर मर्यादित केला पाहिजे. किंवा पुनर्वापर होणाऱ्या संसाधनांचा वापर वाढविला पाहिजे. वारा, सौरऊर्जा यासारख्या आपोआप निर्माण होणाऱ्या साधन संपत्तीचा वापर वाढवला पाहिजे. कोळसा, खनिज तेल,नैसर्गिक वायू यासारख्या नष्ट होणाऱ्या साधनसंपत्तीचा वापर कमी केला पाहिजे, पर्यावरणाला अपायकारक न होणाऱ्या साधन संपत्तीचा वापर केला पाहिजे.साधन संपत्तीचा मर्यादित वापर, पुनर्वापर व पुनर्चक्रीकरण याचा अवलंब करून भविष्यकाळाचाही विचार मनात ठेवणे आवश्यक आहे. साधनसंपत्तीचा चिरंतन वापर या संकल्पनेत अनेक विषयांचा समावेश होतो त्यातील आर्थिक पैलू आणि पर्यावरणीय पैलू हे महत्त्वाचे आहेत

**२. सामाजिक समावेश:–**

वर्तमान आणि भावी पिढ्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आवश्यक घरांचा पुरवठा करून मजबूत,दोलायमान आणि निरोगी समुदायांना समर्थन देणे; समाजाच्या गरजा प्रतिबिंबित करणाऱ्या आणि त्यांच्या आरोग्य, सामाजिक आणि सांस्कृतिक कल्याणास समर्थन देणाऱ्या प्रवेश योग्य स्थानिक सेवांसह उच्चगुणवत्तेचा विकास तयार करून, हे विकासाच्या सर्व क्षेत्रांमध्ये लागू करणे आवश्यक आहे.तसेच,शहरीकरण,शेती,पायाभूत सुविधा,ऊर्जा वापर,पाण्याची उपलब्धता, वाहतूक, प्रभावी शाश्वत विकास साध्य करण्यासाठी, प्राथमिक उद्दिष्टे एकाच वेळी लागू करणे आवश्यक आहे.

**जागतिकीकरणात शाश्वत विकास**

आज मोठ्या प्रमाणात जागतिकीकरण होत आहे. त्यामुळे श्रीमंत व गरीब यातील दरी वाढत आहे. याचा वेग वाढविणे आवश्यक आहे,त्यामुळे व्यावसायिक हेतूचीच पूर्तता होईल असे नव्हे तर सामाजिक सुधारणाही होतील. जागतिक व्यापार समृद्ध होत असताना उपभोक्त्याच्या पसंतीमध्ये उच्च दर्जाच्या समरूपतेस उत्तेजना मिळेल व दुसरीकडे तो सांस्कृतिक व विविधता व परंपरा यातून येत असलेल्या विकास स्थानिक पातळीवर योग्य व टिकवून ठेवण्यासाठी



Late Ramesh Warpudkar College Sonpeth Dist.Parbhani (M.S.)

स्थानिक बाबींचा विचार होणे आवश्यक बनते.त्यामुळे धोरण आखात असताना शाश्वत विकास साठी वैविध्यतेचे महत्व समजून घेणे व टिकविणे ही पूर्व अट ठरते. वाढत्या जागतिक अर्थव्यवस्थेत विकसनशील देश हे आवश्यक त्या कौशल्याअभावी वाटाघाटी व व्यवहारात मागे पडतात. त्यामुळे बहुपक्षीय व्यवहारात सर्व स्तरावर परिणामकारक सहभागासाठी क्षमता वाढविण्यासाठी प्रादेशिक सहकार्याची गरज भासते.

जागतिकीकरणामुळे जगभर सर्व दूर पसरलेल्या लाखो माणसांना उदरनिर्वाह मिळत आहे,मात्र स्थानिक पातळीवर घडलेल्या घटनेचा जगभर परिणाम होतो आहे यामुळे सुरक्षा धोक्यात येऊ शकते. उदां.वर्ल्ड ट्रेड सेंटर/ विश्व व्यापार केंद्रावरील हल्ल्यामुळे भारतीय रोजगारावर झालेला परिणाम किंवा मानवाधिकार किंवा पर्यावरण विषयक आंतरराष्ट्रीय मापदंडाचे पालन न केल्यामुळे एखाद्या देशावर घातलेला आर्थिक निर्बंध विशेषत:विकसनशील देशामध्ये टिकाऊ विकास साधण्यासाठी, जागतिकीकरण हे उपयुक्त साधन करण्यासाठी,व्यापार व रोजगारांचे संरक्षण करण्यासाठी यंत्रणा निर्माण करणे जरुरीचे आहे. युद्ध व लढाया हे शाश्वत विकासातील धोके आहेत. अशा प्रसंगी मध्यस्थी करण्यासाठी प्रभावी यंत्रणा अनिवार्य आहे. त्यामुळे विकास विषयक उद्दिष्टांवर परिणाम न होता विवादास्पद मुद्द्यांवर मार्ग निघू शकेल.शाश्वत विकासासाठी स्थानिक,राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रशासन बळकट करणे

**१. स्थानिक पातळीवर :**

साधनसंपत्तीच्या प्रभावी व्यवस्थापनासाठी सर्व संबंधितांचा सहभाग आवश्यक आहे. स्थानिक पातळीवर लोकशाही संस्थेमुळे सर्वसाधारणपणे नैसर्गिक साधनांचे व्यवस्थापन करणे चांगले जमते.स्थानिक प्रशासनात लोकांचा प्रभावी सहभाग वाढविण्यासाठी लोकनियुक्त व कार्यकारी सदस्य आणि समाजातील गटाचे प्रतिनिधी यांची समिती स्थापन करावी. योग्य ती क्षमता निर्माण झाल्याने समाजाच्या प्राथमिकतेनुसार विकास कामे हाती घेता येतात. प्रकल्पाचे अंमलबजावणी करता येऊन समाजाच्या संपत्तीचे व्यवस्थापन करता येते.भारतामध्ये ७३ व्या व ७४ व्या घटनादुरुस्तीनुसार यापूर्वीच समाजाच्या विकासासाठी पोषक परिस्थिती निर्माण केलेली असल्याने तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी खात्रीने केली पाहिजे.समाजातील सर्व सदस्य विकासासाठी आवश्यक घटक आहेत. यापैकी निम्म्या स्त्रिया आहेत.विकासाच्या प्रक्रियेत महिलांना प्रभावी

Late. Ramesh Warpudkar College Sonpeth Dist. Parbhani (M.S.)



समान भागीदारी करण्यासाठी सकारात्मक [illegible]
सनात अधिकाऱ्यांनी क्षमता निर्माण करण्यात सहभाग मिळविणे आवश्यक आहे.समाजातील वंचित वर्ग, स्थानिक प्रशासनात प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे व विकास प्रक्रियेत मुख्य प्रवाहात प्रभावीपणे भागीदारी करून घेतले पाहिजे.

प्रत्येक समाजाची संपत्ती ही मुले आहेत. मुलांना त्यांच्या क्षमतांचे आकलन करून देणे,आरोग्यदायक संपन्न व समाधानी वातावरणात मुलांचे संगोपन करणे,ही केवळ पालकांचीच नव्हे तर समाजाची ही जबाबदारी आहे. लोकसंख्येतील व्यावसायिक सांस्कृतिक आणि आर्थिक बहुविविधता ही एकप्रकारे शाश्वत विकासातील एक मोठी संपत्ती आहे,परंतु अशा काही वेळा येतात की जेव्हा हीच बहुविविधता कलह व सामाजिक सुरक्षिततेस कारणीभूत ठरते. सर्व टाळण्यासाठी नागरिकांचा समूह व स्थानिक अधिकारी यांची सर्व समावेशक यंत्रणा उदयास आणणे अत्यावश्यक आहे.

**२. राष्ट्रीयपातळीवर:**

शाश्वत विकास हा केवळ एक प्रकारच्या मार्गाने साध्य न होता विविध प्रकारच्या मार्गाने साध्य होत असतो.शासकीयविभागांमध्ये एकत्रित काम करण्यासाठी वेगवेगळ्या विभागांचे संघटन करून, तर काही प्रकारणात एकत्रित बहु अनुशासित अधिकारी यांच्या आवश्यकता असते. त्यांच्या अंमलबजावणीसाठी संयुक्त नियोजन,पारदर्शकता आणि समन्वय आवश्यक आहे. समाजातील नागरी संस्था जसे की एनजीओ,महामंडळे, शैक्षणिक व संशोधन संस्था, कामगार संघटना इ. ना ही शाश्वत विकासाच्या नियोजनात व अंमलबजावणी सहभागी करून घेऊन त्यांच्याकडील समृद्ध कौशल्यांचा उपयोग करून घेतला पाहिजे.एकीकडे कायद्याचा अतिरेक होतो आहे.काही कायदे कालबाह्य झालेले आहेत,तर दुसरीकडे आजच्या काळाशी सुसंगत्व प्रशासनासाठी उपयोगी असलेल्या कायद्याची प्रभावी अंमलबजावणीची कमतरता आहे. यासाठी कायद्याचा आढावा घेणे, कालबाह्य कायद्याचे निर्बंधन करणे व जे उचित कायदे आहेत त्याच्या वापराच्या कार्यपद्धती सुलभीकरण करण्याची गरज प्रतिपादित करायला हवी. अंतर्गत पुनरावलोकन व आंतरराष्ट्रीय अनुभवांच्या आधारे अस्तित्वात असलेल्या कायद्याचे अवलोकन करून त्रुटी भरून काढणे जरुरीचे आहे. कायद्याच्या अंमलबजावणीसाठी सक्षम यंत्रणा नसेल तर कायदेही उपाय काढू शकत नाहीत. परंपरागत पद्धती व प्रथांच्या, मूल्यांच्या व वैधतेचे अंगीकरण

Late. Ramesh Warpudkar College Sonpeth Dist. Parbhani

करून सरकारच्या विचार पद्धतीत व धोरणात त्या समाविष्ट केल्या पाहिजेत. त्यासाठी योग्य ती यंत्रणा निर्माण केली पाहिजे. अनेक योजना या शाश्वत विकास ही मुख्य बाब म्हणून उदयास येण्यापूर्वी आंखल्या गेलेल्या होत्या व त्यावर काही धोरणे ही विशिष्ट क्षेत्रासाठी आखली गेली होती. त्यांचे शाश्वत विकासाच्या दृष्टिकोनातून पुनरावलोकन करणे गरजेचे आहे. तसेच ज्या क्षेत्रात धोरणांचा अभाव आहे अशी क्षेत्रे शोधून काढली पाहिजेत, आणि शाश्वत विकासाच्या चौकटीची अनिवार्यता ओळखून अशा क्षेत्रात यशस्वी ठरलेली उदाहरणे व धोरणे लक्षात घेऊन सुसंगत योजना तयार केल्या पाहिजेत.

**३. आंतरराष्ट्रीय पातळीवर:**

शाश्वत विकासामध्ये प्रादेशिक व जागतिक सहकार्याची गरज आहे. सामाजिक बाबीमध्ये सागरी व नदी किनारे,सीमापार पर्यावरणीय परिणाम, जैविक साधनांची व्यवस्थापन,तंत्रज्ञानाची देवाणघेवाण आणि शाश्वत विकासातील अनुभव इ.आहेत.आंतरराष्ट्रीय स्तरावर विशेषत: विकसनशील राष्ट्रांनी अनुभवाचा आणि शाश्वत विकासातील अनुभव सहयोग देऊन प्रादेशिक मुद्यांबाबत एकजुटीने आवाज उठवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. शाश्वत विकास प्रक्रियेत आंतरराष्ट्रीय स्तरावर,अंतरदेशीय व जागतिक अनुभवांची देवाणघेवाण करण्यासाठी यंत्रणा उभारली पाहिजे.देशामध्ये विविध पर्यावरण विषयक करातील बंधनांची पूर्तता करण्यासाठी यंत्रणा असली पाहिजे.सध्या अशा संस्थांची संख्या मोठी आहे पण त्यांच्या जबाबदाऱ्या विखुरलेल्या आहेत. सहकार्य व पुर्तता करण्यासाठी अजून चांगले प्रशासन पद्धतीची गरज आहे.

* विकास म्हणजे विपुलता की विकास म्हणजे शांती समृद्धी व आनंदा याचा तुम्ही विचार केला पाहिजे– **सुंदरलाल बहुगुणा.**

* 'जोपर्यंत मानवी संस्कृतीत अहिंसेचे तत्व केंद्रस्थानी स्वीकारले जाणार नाही तोपर्यंत पर्यावरणाची चळवळ ही निसर्गाच्या विरोधात हिंसेला प्रतिबंध करण्यास यशस्वी झाली आहे असे म्हणता येणार नाही.' **महात्मा गांधी**

मानवाच्या गरजा अशा आकांक्षा व अपेक्षांची पूर्तता करणे हे विकासाची उद्दिष्ट आहे.शाश्वत विकासाकरिता माणसाच्या मूलभूत गरजांची पूर्तता करण्याच्या दृष्टीने सर्व संधी उपलब्ध करून देणे आवश्यक असते.जर माणसाने दैनंदिन जीवन जगणे किमान जीवनमानाच्या पलीकडे गेलेले असेल तर त्या जगण्याच्या सर्व संधी उपलब्ध होतात असे म्हणता येईल,आणिअशा परिस्थितीतच किमान



दैनंदिन गरजांची पूर्तता स्थिरपण

ठेवण्यासाठी त्यास किमान जीवनमान अधिक गरजा पूर्ण करण्याच्या संधी उपलब्ध करून देण्यास शाश्वत विकास म्हटले जाते.यादृष्टीने शाश्वत विकासाची उद्दिष्टे स्पष्ट करता येतील.पर्यावरणीय नाशवंत घटकांचे पुनरुज्जीवन करणे. मानवी कृत्ये वा नैसर्गिक आपत्तीमुळे ज्या ज्या पर्यावरणीय घटकांची हानी झालेली असेल पर्यावरणाचा ऱ्हास असेल त्या त्या घटकांचे पुनर्जीवन करणे उदा.जंगल व वृक्षतोड थांबून ऋतुमानाचे चक्र नियमित नियंत्रित ठेवता येते.

***भूतकालीन नुकसानीतून भविष्यकालीन उत्पादन करणे:**

जुन्या टाकाऊ वस्तूंपासून टिकाऊ वस्तू तयार करण्याच्या प्रयोगातून भूतकालीन नुकसान भविष्यकालीन उत्पादकतेत रूपांतरित करता येऊ शकते. उदा.पुस्तकाच्या वृत्तपत्राच्या छपाईसाठी टाकाऊ कागदावर प्रक्रिया करून त्याच्या वापरा वापरण्यायोग्य कागद बनविणे व त्यावर छपाई करणे

***बदलत्या मानवी गरजांसाठी संसाधनांचे व्यवस्थापन:**

हेन्री फॉलेट यांनी सांगितल्याप्रमाणे कोणतेही कार्य व्यवस्थापन असल्याशिवाय यशस्वीपणे योग्यपणे पार पाडता येतङनाही.शाश्वत विकास हा पर्यावरणीय असतो.पर्यावरण व प्रगती विकासाच्या दोन बाजू आहेत.मात्र हे परिवर्तन मानवी गरजांशी सुसंगत असेल तरच ते फलदायी ठरू शकते.राष्ट्राकडे उपलब्ध असलेल्या संसाधनांचे वितसर व्यवस्थापन करून नागरिकांच्या बदलत्या गरजा व अपेक्षांशी संतुलन साधण्यासाठी शाश्वत विकास हा आवश्यक असतो.

*** पर्यावरण गुणवत्ता टिकवणे:**

वर्तमानपिढीबरोबरच भावी पिढीला ही पर्यावरणाच्या स्थायित्वातून विकासाच्या संधी प्राप्त होऊ शकतात.पर्यावरण शाश्वत व चिरस्थाई असेल तरच विकासाची फळे भावी पिढीला चाखता येतात.आणि विकासाच्या वारसा पुढे नेण्याची क्षमता शाश्वत विकासातून निर्माण होऊ शकते.

*** वाढत्या लोकसंख्येची गरज पूर्ण करणारी साधने:**

लोकसंख्या वाढ हा विकास प्रशासनातील आणि पर्यावरण प्रशासनासमोरील फार मोठा अडथळा आहे.लोकसंख्यावाढीमुळे संसाधनांच्या पुरवठ्यामध्ये व्यत्यय येतो,परिणामी विकासातही स्थायित्व राहत नाही.वाढणारी लोकसंख्या व संसाधनांची मर्यादा हे व्यस्त प्रमाण विकासास मारक ठरते.शाश्वत विकास लोकसंख्या वाढीसारख्या समस्येतही संसाधनांचा पुरवठा व योग्य वापर करण्याचे

...त्र राबविते अशा समस्यांशी मेळ घालण्यासाठी शाश्वतविकास उपयोगी ठरतो.

***प्रदूषण व पर्यावरण ऱ्हासावर नियंत्रण ठेवणे:**

शाश्वत विकास संकल्पना प्रदूषण नियंत्रणाची प्रयत्न करते.पर्यावरणाची हानी पुढच्या पिढीला हानिकारक ठरते. शाश्वत विकास भावी पिढीला नियंत्रित, संतुलित,सशक्त पर्यावरण हस्तांतरित करतो.त्यायोगे भावी पिढीचे जीवनमान सुधारविणे हा एक उद्देश असतो. सामाजिक व आर्थिक विकासाचा पर्यावरणाशी संबंध आहे. त्या संसाधनांना मानवाने शाश्वत विकासाच्या माध्यमातून पावतीच दिलेली आहे.

**सारांश ***

आपल्या समाजात आपल्या अस्तित्वासाठी आवश्यक असलेली संसाधने संपुष्टात येणार नाहीत याची खात्री करण्यासाठी शाश्वतविकास महत्त्वाचा आहे. शाश्वत विकासाला चालना देणाऱ्या प्रक्रिया राबवून,संसाधनांचा वापर करून मानवी सभ्यता अनेक वर्षे टिकून राहू शकते.शाश्वत विकासाची निवड करून अनेक प्रश्न सोडवता येतात.गरिबी,हवामानातील बदल,जलचर जीवनातील व्यत्यय,हरितगृह वायूंचे उत्सर्जन यासारख्या आर्थिक समस्यांचे निराकरण करता येईल.

शाश्वत विकासाचा अवलंब केल्याने,निसर्गाने नैसर्गिक हाक घेतल्याने आपण परिसंस्थेमध्ये संतुलन राखण्यात सक्षम होऊ.उपलब्ध संसाधनांचा विवेक-पूर्वक वापर करून आणि पर्यावरणीय संतुलन राखणे आवश्यक आहे. पर्यावरण ऱ्हास रोखून आपण पर्यावरणाचे रक्षण करावयास हवे.संसाधनांचे अतिशोषण रोखणे हे आपले परम कर्तव्य मानले पाहिजे.या सर्व विचार व कृतीतून आपण सर्व मानवजातीचे कल्याण करण्यासाठी मोलाचा हातभार निश्चितपणे लावू शकतो व येणाऱ्या पिढ्यांचे भविष्य उज्ज्वल करू शकतो यात शंका नाही.

**संदर्भ –**


१. डॉ. पोहेकर प्रीती लोकप्रशासनातील नवप्रवाह,अरुणा प्रकाशन, लातूर , पान नं.१०९ ते११३

वोतखेडे दत्ता, शाश्वत विकास, पीबीडी पब्लिकेशन, पुणे,२०१५ पान नं.१ ते ४ ,९ ते १२



Late Ramesh Warpudkar College Sonpeth Dist.Parbhani (M.S.)





https://emeraldbe.com/sustainable-development

https://emeraldbe.com/sustainable-development-important/:

https://education.nationalgeographic.org/resource/sustainable-development-goals/

https://mr.m.wikipedia.org/wiki/%E0%-4%B6%E0

http://www.un.org/sustainabledevelopment/sustainable-development-goals/

http://www.un.org/sustainabledevelopment/sustainable-development-goals/

https://mr.m.wikipedia.org/wik/


***


PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani